**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.डी ए पौळ वकील यांच्यामार्फत सुरु.</u>**

**२.** माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस कॉलेज किनगांव येथे माझे शिक्षण झाले आहे. किनगांव ते कोपरा हे तीन कि मी अंतर आहे. हे खरे की, वादी व प्रतिवादी यांच्या जमीनी किनगांव ते कोपरा रस्त्यालगत आहेत. मला वादी प्रतिवादी यांच्या जमीनींची सर्वे नंबर माहिती नाही. कोणती जमीन कोण वहिती करते हे मला माहिती आहे. माझ्या व्यतिरिक्त त्या जे सी बी मशीनवर जोंधळे हे सताळा गावातील व्यक्ती ऑपरेटर होते. वादीच्या जमीनीशिवाय सदर जेसीबी भाडयाने अन्य जमीनींवरती सुध्दा काम करायला जात असे. जेसीबी मशिनचा सर्व व्यवहार वादीचा मेहुणा गोविंद बैकरे हे पहात होते, हे म्हणणे खरे आहे. मी सांगतो की पुर्णवेळ गोविंद हे व्यवहार पहात नव्हते. डाळींबाचे पिक कोणत्या सर्वे नंबर मध्ये होते हे मला माहिती नाही. बापूराव पाटील, भानुदास देपे, बळीराम देपे आणि गणपती देपे यांच्याकडूनही वादीने ३५ एकर जमीन खरेदी केलेली होती व त्यात डाळींब पिक केले होते, हे खरे आहे. हे खरे की, त्या जमीनीत पाईपलाईन व ड्रिप केली होती. हे खरे की, किनगांव साठवण तलावातून आणलेली पाईपलाईन गंगाधर देपे यांच्या विहीरीमध्ये आणून सोडली होती. सर्वे क्र ५/१ मध्ये असलेल्या विहीरीमधून वादी व प्रतिवादींच्या जमीनीला पाणी जाते हे खरे आहे. हे खरे की, त्या पाईपलाईनचे खोदकाम मी स्वता केले आहे. डाळींबाची रोपे नाशीक येथील बापू जाधव यांच्याकडून घेण्यात आली होती. मी तेथे कार्यरत असताना वादी यांना कर्करोज नव्हता, याबददल मला माहिती नाही. हे खरे की, ते शेतावरती येत होते. हे खरे की, राहूल देपे यांचे शिक्षण २००५ साली संपले आहे. २००७-२००८ सालापर्यंत राहूल कॉलेजला जात होता, असे सरतपासात जे मी सांगितले ते खोटे आहे, यास माझे सांगणे की ते शिकत होते हे खरे आहे, वर्षाचे मला माहिती नाही. हे खरे की, विहीरीवरुन शेतावर गेलेली पाईपलाईन डॉ. वारद यांनी २००७ साली फोडली होती. हे खरे की, त्याबददल वादीने नुकसानभरपाईसाठी दावा केला होता. हे खरे नाही की, वादमिळकतीमध्ये

असलेल्या डाळींब बागेशिवाय त्याठिकाणी अन्य कोणाचीही डाळींब बाग नव्हती असे मी खोटे सांगतो. वादीच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे, हे खरे नाही.

**प्रतिवादी क्रं. ६ ते ९ तर्फे विधीज्ञांनी उलटतपास नाकारला.**
**उलटतपास पूर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष

**स्वाक्षरीत/**
**(एस.एन.सरडे)**

दिनांक १८/०४/२०२६. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.